बी-हेवी (B-Hy), सी-हेवी (C-Hy) मळी व ऊसाचा रस या तीन स्वतंत्र स्त्रोतांपासून इथेनॉल निर्मिती करुन त्याची आसवनीच्या टाक्यांमध्ये साठवणूक करण्यास तसेच प्रमाणित करुन विक्री करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : एमपीएल-१११८/प्र.क्र.३४७/राउशु-३
५ वा मजला (विस्तार), मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १७ जुलै, २०१९

वाचा :- शासनाचा समक्रमांकीत दि. २३ जानेवारी, २०१९ रोजीचा शासन निर्णय.

शासन शुध्दीपत्रक :-

उपरोक्त वाचा येथील दि.२३ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४ मध्ये बदल करण्यात येत असून तो आता खालीलप्रमाणे वाचावा :-

"४. अनुज्ञप्तीधारकाने/घटकाने प्रभारी अधिकारी अथवा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना ऊसाचा रस/ बी-हेवी/सी-हेवी मळीपासून इथेनॉल उत्पादन घेण्याबाबत लेखी कळविल्यानंतर आठ कार्यालयीन दिवसाच्या आत संबंधितांना परवानगीबाबतचा निर्णय कळवावा. यानुषंगाने, निर्णय घेण्यासाठी पुढीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात येत आहे :-

४.१ घटकाकडून विनंती प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधीक्षक कार्यालयाने २ दिवसात ही बाब आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना कळवावी. तद्नंतर, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यानुसार ३ दिवसात प्रस्ताव शासनास सादर करावा. शासन स्तरावर त्या प्रस्तावास ३ दिवसात शासनाची मान्यता घ्यावी.

४.२ सदर कालमर्यादा बंधनकारक करण्यात येत असून सदर कालमर्यादेचे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करावी. शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे संबंधित क्षेत्रीय कार्यालये आणि अनुज्ञप्तीधारकास/घटकास कळवावे. त्यानंतरच घटकाने ऊसाचा रस, बी-हेवी अथवा सी-हेवी मळीपासून जलरहित मद्यार्काचे उत्पादन सुरु करावे."

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०७१७१६४९३२५७२९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकीत करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudhakar Shahaji Yadav

Digitally signed by Sudhakar Shahaji Yadav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e782c1e59acd749fc48c691d7a8c477d6ac39c1904204f442b52d728d48a67a, cn=Sudhakar Shahaji Yadav
Date: 2019.07.17 16:56:06 +05'30'

(सुधाकर श. यादव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.

३. मा.मंत्री/राज्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२.
५. प्रधान सचिव (राउशु), गृह विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई - ३२.
६. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई -२३.
७. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
९. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
१०. कार्यासन राउशु-३ (संग्रहार्थ).